# सलामीच्या स्थानाबाबत साशंक!

## पूर्ण 'आयपीएल'मध्ये डावाची सुरुवात करण्याबाबत ऋषभ पंतचे वक्तव्य

**वृत्तसंस्था, लखनऊ**



**इंडियन प्रीमियर** लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या गतहंगामातील अपयशानंतर यंदा नव्या उमेदीने मैदानात उतरणाऱ्या ऋषभ पंतने पहिल्याच सामन्यात दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध सलामीला खेळण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय केवळ एका सामन्यापुरता होता की संपूर्ण हंगामात तोच सलामीलाच उतरणार, याचे थेट उत्तर पंतकडेही नाही.

नव्या हंगामातील सलामीच्या सामन्यात पंतच्या नेतृत्वाखालील लखनऊ सुपर जायंट्स संघाला दिल्ली कॅपिटल्सकडून हार पत्करावी लागली. घरच्या मैदानावरील या सामन्यात लखनऊच्या फलंदाजांनी निराशाजनक कामगिरी केली. त्यातच पंतला नशिबाची साथ लाभली नाही. तो केवळ सात धावांवर असताना नॉन-स्ट्राईकवर धावचीत झाला. त्याचा सलामीचा जोडीदार मिचेल मार्शने समोरील दिशेस चेंडू मारला आणि तो गोलंदाजी करणाऱ्या मुकेश कुमारच्या हाताला लागून थेट यष्टींवर आदळला. त्यावेळी पंत क्रीजच्या बाहेर होता. त्यामुळे नव्या हंगामाची सुरुवातही त्याच्यासाठी फारशी चांगली झाली.

गेल्या हंगामात लखनऊसाठी मार्श आणि एडीन मार्करम यांनी सलामीला खेळताना चमक दाखवली होती. पंत मधल्या फळीत खेळताना अपयशी ठरला होता. त्यातच अनेकदा त्याने स्वतःच्या फलंदाजीचा क्रम बदलल्याने त्याच्यावर टीकाही झाली होती. यंदा तो तिसऱ्या क्रमांकावर खेळणार अशी चर्चा असताना त्याने पहिल्या सामन्यात सलामीला खेळण्याचे ठरवले. ट्वेन्टी-२० कारकीर्दीत त्याने केवळ २३ डावांत सलामीवीराची भूमिका बजावली असून त्यात एक शतक आणि पाच अर्धशतके साकारली आहे. आता पूर्ण हंगामात तू सलामीला खेळणार का, असे सामन्यानंतर विचारले असता, ''अजून ते ५०-५० टक्के आहे. आम्ही विचार करत आहोत. मी संपूर्ण हंगामात आघाडीच्या फळीतच खेळणार हे मात्र नक्की,'' असे उत्तर पंतने दिले.

गतहंगामात सातत्याने तिसऱ्या क्रमांकावर खेळलेल्या निकोलस पूरनला दिल्लीविरुद्ध पाचव्या क्रमांकावर खेळवण्याच्या निर्णयाचेही पंतने समर्थन केले. ''मी सलामीला खेळल्याने मधल्या फळीत अनुभव असावा असा आमचा विचार होता. पूरन मधल्या षटकांत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवू शकतो. सुरुवातीला गडी गमावल्यास आयुष बदोनीला वरच्या क्रमांकावर पाठवायचे हे आम्ही आधीच ठरवले होते. त्याच्यासाठी ही मोठी संधी होती. मात्र, आमच्या योजनांना यश आले नाही,'' असे पंत म्हणाला.

# चेन्नईचे विजयी पुनरागमनाचे ध्येय



**चेन्नई :** सलामीच्या लढतीत निराशाजनक कामगिरी करणाऱ्या चेन्नई सुपर किंग्जचे विजयी पुनरागमनाचे ध्येय असून 'आयपीएल'मध्ये आज, शुक्रवारी त्यांच्यासमोर पंजाब किंग्जचे आव्हान असेल. चेन्नई संघाने घरच्या मैदानावर कायमच चमकदार कामगिरी केली आहे. आता आपल्या चाहत्यांच्या पाठिंब्यासमोर दर्जेदार खेळ करण्याचाच त्यांचा मानस असेल. महेंद्रसिंह धोनी जायबंदी असल्याने या सामन्यातही खेळू शकणार नाही.

राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या पहिल्या सामन्यात चेन्नईची सुरुवात चांगली झाली नाही. युवा खेळाडूंचा समावेश असलेल्या चेन्नईला गुवाहाटी येथे झालेल्या लढतीत सर्वच विभागांत झगडावे लागले. या पराभवाला मागे टाकत संघाला आता नव्याने मोहिमेची सुरुवात करावी लागेल. गेल्या महिन्यात ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर झालेल्या सामन्यांत मोठ्या धावसंख्या पाहायला मिळाल्या होत्या. त्यामुळे आता चेन्नई-पंजाब सामन्यासाठीही खेळपट्टीही फलंदाजीला अनुकूल असण्याची शक्यता आहे.

- **वेळ :** सायं. ७.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

# इटली फुटबॉल महासंघाच्या अध्यक्षांचा राजीनामा

**रोम :** इटलीचा फुटबॉल संघ सलग तिसऱ्यांदा विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरण्यात अपयशी ठरल्यानंतर मायदेशात टीकेची झोड उठली आहे. राजकीय दडपणानंतर इटली फुटबॉल महासंघाचे अध्यक्ष गॅब्रिएले ग्राविना यांनी पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे. आता जेनारो गाटुसोही प्रशिक्षकपदाचा राजीनामा देणे अपेक्षित आहे.

एकेकाळी फुटबॉलविश्वावर वर्चस्व गाजवणाऱ्या, चार वेळच्या जगज्जेत्या इटली संघावर आता सलग तिसऱ्यांदा विश्वचषकातून बाहेर राहण्याची नामुष्की ओढवली आहे. इटलीने अखेरचा विश्वचषक सहभाग २०१४ मध्ये नोंदवला होता, तर विश्वचषकात बाद फेरीतील अखेरचा सामना २००६ मध्ये जिंकला होता.

# निर्मिती क्षेत्राला घरघर

**पीटीआय, नवी दिल्ली**

**पश्चिम आशियातील** युद्धामुळे देशातील निर्मिती क्षेत्र मार्च महिन्यात घरघर लागल्याचे सरकारी मासिक सर्वेक्षणातून गुरुवारी समोर आले. युद्धामुळे बाजारपेठेत अस्थिरता वाढली असून, त्याचाच परिणाम होऊन नवीन कार्यादेश आणि उत्पादनात घट झाल्याचेही सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

देशातील निर्मिती क्षेत्राचा प्रवास नोंदविणाऱ्या एचएसबीसी इंडियाद्वारे निर्मिती क्षेत्रातील खरेदी व्यवस्थापकांचा कल जोखणाऱ्या सर्वेक्षणावर आधारित (पीएमआय)

> देशाच्या पीएमआय निर्देशांकाने गेल्या महिन्यात जून २०२२ नंतरची नीचांकी पातळी गाठली आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला फटका बसला असून, त्याचा परिणाम देशातील निर्मिती क्षेत्रावर होत आहे. ॲल्युमिनियम, रसायने आणि इंधन यासह इतर कच्च्या मालाच्या किमती वाढल्या आहेत.
>
> – प्रांजुल भंडारी, मुख्य अर्थतज्ज्ञ, एचएसबीसी

निर्देशांक मार्च महिन्यात ५३.९ गुणांवर नोंदविण्यात आला. त्याआधीच्या महिन्यात (फेब्रुवारी २०२६) निर्देशांक ५६.९ गुणांवर नोंदविला गेला होता. गेल्या महिन्यात निर्देशांकाने मागील चार वर्षांतील सर्वांत खराब कामगिरी नोंदविली आहे. निर्देशांक ५० गुणांवर असल्यास विस्तारपूरकता तर ५० गुणांखाली असल्यास आकुंचन दर्शवतो. निर्मिती क्षेत्राच्या वाढीचा वेग कमी झाला असला तरी रोजगार निर्मितीत मात्र वाढ झाली आहे. ही वाढ गेल्या सात महिन्यांतील सर्वाधिक ठरली आहे.

नवीन कार्यादेश आणि उत्पादनातील वाढ मार्च महिन्यात कमी झालेली आहे. बाजारपेठेतील आव्हानात्मक स्थिती, किमतीची दबाव आणि पश्चिम आशियातील युद्ध हे घटक यासाठी प्रामुख्याने कारणीभूत ठरले आहेत. निर्मिती क्षेत्रातील कंपन्यांवर किमतीचा दबाव वाढत असून, उत्पादनांच्या किमतीतील वाढ तुलनेने कमी आहे. अनेक कंपन्यांना नवीन ग्राहक मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागत आहेत. मात्र, मार्च महिन्यात बाह्य विक्रीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, युरोप, जपान, आखाती देश, तुर्की आणि व्हिएतनाममधून ही वाढ झाली आहे, असे सर्वेक्षणात स्पष्ट करण्यात आले आहे.

# आयटी, बँकिंगच्या जोरावर 'सेन्सेक्स'ची फेरउसळी

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** देशांतर्गत आघाडीवर माहिती तंत्रज्ञान आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांमध्ये झालेल्या जोरदार 'व्हॅल्यू बाईंग'मुळे तसेच रुपयामध्ये झालेल्या जलद सुधारणेमुळे, प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स १८५ अंशांनी वधारला, तर निफ्टी २२,७०० पातळीच्या वर स्थिरावला.

सेन्सेक्स दिवसाच्या नीचांकी पातळीवरून २००० हून अधिक अंशांनी उसळी घेत अखेर १८५.२३ अंशांच्या वाढीसह ७३,३१९.५५ या पातळीवर बंद झाला. निर्देशांकाची सुरुवात घसरणीसह झाली होती आणि सत्राच्या पहिल्या सत्रात त्याने १,५८८ अंश गमावत ७१,५४५.८१ या दिवसाच्या नीचांकी पातळीवर पोहोचला होता. एचसीएल टेक आणि टीसीएससारख्या आघाडीच्या आयटी कंपन्यांमध्ये, तसेच एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँकेसारख्या बँकिंग क्षेत्रातील ब्लूचिप समभागांमध्ये झालेल्या जोरदार खरेदीमुळे बाजाराला सावरण्यास मदत झाली. निफ्टीनेही अशीच वाटचाल करत ३३.७० अंशांच्या वाढीसह २२,७०० पातळीच्या वर, म्हणजेच २२,७१३.१० या पातळीवर बंद झाला.


**Chola** Enter a better life

**चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड**

कॉर्पोरेट कार्यालय : "चोला क्रेस्ट", सी-54 व 55, सुपर बी-4, थिरू व्ही. का. इंडस्ट्रियल इस्टेट, गिंडी, चेन्नई – 600032. शाखा कार्यालय: शाखा कार्यालय: चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड, आकार इनोव्हेशन्स, पहिला मजला, सर्वे क्र. 3516/A/38, हिरे भवन समोर, महात्मा फुले पुतळ्याजवळ, फाशी पूल रोड, धुळे – 424001 संपर्क क्रमांक: श्री. दीपक पगारे, मोबाईल क्र. 8149772777

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा पुढे चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड असा उल्लेख करण्यात येणाऱ्या मे. चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **सांकेतिक ताबा** घेतलेला आहे. सदर सुरक्षित मालमत्ता **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे"** आणि **"तेथे जे काही आहे"** तत्त्वावर ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. याद्वारे सर्वसाधारण जनतेस सूचित करण्यात येते की आम्ही सदर जाहीर लिलाव www.auctionfocus.in/chola-lap या वेबसाईटच्या माध्यमातून करणार आहोत.

| ई-लिलाव दिनांक व वेळ : | ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख : | तपासणी दिनांक : |
|---|---|---|
| 06-05-2026 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत (प्रत्येक वेळी 3 मिनिटांची अमर्याद वाढ लागू राहील). | 05-05-2026 (सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत) | 27-04-2026 |

| अनु क्र. | खाते क्र. आणि कर्जदार, सह-कर्जदार/गहाणदार यांची नावे | कलम 13(2) अंतर्गत मागणी नोटीसनुसार दिनांक व रक्कम | राखीव किंमत, अनामत रक्कम आणि बोली वाढीची रक्कम (रुपयांमध्ये) | सूचना कालावधी / ताब्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1. | कर्ज खाते क्र.: ML01DUL00000060634 आणि ML01DUL00000105978 1. नागेश्वर बापू थेलारी 2. मेसर्स शेतकरी कृषी सेवा कांदरा 3. पार्वताबाई बापू थेलारी 4. बापू शिवा थेलारी सर्व रा. पोस्ट शिरधाणे प्रा नेर, व्हीटीसी शिरडाणे प्रगणे नेर, ता. धुळे, जिल्हा धुळे - 424303 | 10/09/2025 रु. 22,49,156/- 10-09-2025 रोजी | रु. 52,00,000/- रु. 5,20,000/- रु. 1,00,000/- | 30 दिवस / सांकेतिक ताबा |
| | **मालमत्तेचे वर्णन :** मालमत्तेचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग गट मिळकत क्रमांक 1120, क्षेत्रफळ सुमारे 2400 चौ. फूट (30 x 80 चौ. फूट), तळ मजला, शिर्धाणे प्रा. नेर, ता. व जि. धुळे येथे स्थित, **चतुर्सिमा पुढीलप्रमाणे आहेत – पूर्वेस** – रस्ता, **पश्चिमेस** – मोकळी जागा, **उत्तरेस** – सौ. पंजाबाई काशिनाथ शिंदे यांची मालमत्ता, **दक्षिणेस** – श्री. प्रकाश ओंकार पाटील यांची मालमत्ता. | | | |
| | **सीआयएफसीएलला ज्ञात असलेले भार/दायित्वे: ज्ञात नाही** | | | |

1. सर्व इच्छुक सहभागी / बोलीदारांनी **www.auctionfocus.in/chola-lap** आणि **www.cholamandalam.com/news/auction-notices** या संकेतस्थळांना भेट द्यावी. अधिक तपशील व सहाय्यासाठी इच्छुक बोलीदारांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा — **श्री. मुहम्मद रहीस – मो. नं. 8124000030 / 6374845616, ई-मेल आयडी : CholaAuctionLAP@chola.murugappa.com.** फक्त ई-लिलाव प्रशिक्षणासाठी M/s. Auction Focus प्राची त्रिवेदी - 9016641848 यांच्याशी संपर्क साधावा.
2. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तींबाबत अधिक माहितीसाठी कृपया **www.auctionfocus.in/chola-lap** आणि **www.cholamandalam.com/news/auction-notices** या संकेतस्थळांना भेट द्यावी.

ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत देण्यात येणारी वैधानिक 30 दिवसांची विक्री सूचना

दिनांक: 03.04.2026, स्थळ: धुळे (प्राधिकृत अधिकारी), चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड



**डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.**
DNS BANK (मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

**सूचना**

**उपरोक्त बँकेच्या खालील ग्राहकांनी सेफ डिपॉझिट लॉकर भाड्याने घेतलेले आहेत. संबंधित लॉकर अनेक वर्षांपासून वापरात नाहीत तसेच त्यांचे भाडे बँकेस अदा केलेले नाही.**

**यासंदर्भात बँकेच्या शाखेकडून उपलब्ध पत्त्यावर अनेक वेळा सूचना पाठविण्यात आलेल्या असूनही संबंधित ग्राहकांकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. म्हणून, खालील ग्राहकांना कळविण्यात येते की, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत त्यांनी शाखेत प्रत्यक्ष हजर राहून आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी.**

**अन्यथा, बँक कायद्यानुसार लागू असलेल्या नियमांप्रमाणे संबंधित लॉकर्स उघडण्याची कार्यवाही करण्यात येईल व त्यासाठी होणाऱ्या सर्व खर्चाची जबाबदारी संबंधित ग्राहकांची राहील, याची नोंद घ्यावी.**

**ग्राहकांची यादी**

| शाखेचे नाव | खातेदाराचे नाव | लॉकर खाते क्रमांक |
|---|---|---|
| छ. संभाजीनगर | सुभाष गंगाधर पालोडकर | ०६३०८०१०१२३५६५१ |
| छ. संभाजीनगर | ठोकळ कुसुम उत्तमराव | ०६३०८०१०१२३५६५६ |
| छ. संभाजीनगर | देशपांडे तुळजादास दुर्गादास | ०६३०८०१०१२३५६७७ |
| छ. संभाजीनगर | तोंगिरे अमित शांतिलाल | ०६३०८०६०१२३५६९६ |
| छ. संभाजीनगर | राय जय प्रकाश | ०६३०८०६०१२३५७०० |

शाखा व्यवस्थापक
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
Dombivli Nagari Sahakari Bank Ltd.
dns.bank.in



**ग्रीव्हज कॉटन लिमिटेड**

**GREAVES** Empowering Lives

**कॉर्पोरेट आयडेन्टीटी नंबर:** एल९९९९९एमएच१९२२पीएलसी०००९८७
**नोंदणीकृत कार्यालय:** जे-२, एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र, चिखलठाणा, छत्रपती संभाजी नगर - ४३१ २१०
**कॉर्पोरेट कार्यालय:** युनिट क्र. ३०१ आणि ३०२, तिसरा मजला, टॉवर बी, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, ऑफ सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ **दूरध्वनी:** +९१-२२ ४१७१ १७००
**ई-मेल:** investorservices@greavescotton.com; **वेबसाईट:** www.greavescotton.com

**विशेष संधी - भौतिक स्वरुपातील समभागांच्या हस्तांतरणासाठी पुन्हा अर्ज दाखल करणे**

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (SEBI) यांनी १ एप्रिल २०१९ पासून भौतिक स्वरुपातील शेअर्सच्या हस्तांतरणावर बंदी घातली होती. तथापि, १ एप्रिल २०१९ पूर्वी सादर केलेल्या पण कागदपत्रांतील त्रुटींमुळे परत आलेल्या भौतिक शेअर हस्तांतरण विनंत्यांच्या पुनः-निवेदनासाठी SEBI ने ७ जुलै २०२५ ते ६ जानेवारी २०२६ या कालावधीत विशेष विंडो उपलब्ध करून दिली होती. गुंतवणूकदारांच्या सोयीसाठी, SEBI ने आणखी एक विशेष विंडो ५ फेब्रुवारी २०२६ ते ४ फेब्रुवारी २०२७ या एक वर्षाच्या कालावधीसाठी उघडण्याचा निर्णय घेतला आहे. भौतिक समभागांच्या हस्तांतरणासाठी विशेष विंडो अंतर्गत विनंती सादर करताना, अनिवार्य अटींपैकी एक म्हणजे मूळ शेअर प्रमाणपत्र सादर करणे, जे पुढीलप्रमाणे आहेः

| हस्तांतरण पत्राच्या अंमलबजावणीची तारीख | हस्तांतरणासाठी १ एप्रिल, २०१९ रोजी अर्ज दाखल केला आहे का? | हस्तांतरणासाठी १ एप्रिल, २०१९ रोजी अर्ज दाखल केला आहे का? | सध्याच्या कालावधीत अर्ज दाखल करण्यास पात्र आहात का? |
|---|---|---|---|
| १ एप्रिल, २०१९ पूर्वी | नाही (ही नवीन नोंदणी आहे) | होय | √ |
| | होय (ते यापूर्वी नाकारण्यात आले होते/परत पाठवण्यात आले होते) | होय | √ |
| | होय | नाही | × |
| | होय | नाही | × |

याव्यतिरिक्त, खालील प्रकरणांचा या विशेष विंडो अंतर्गत विचार केला जाणार नाहीः

- हस्तांतरकर्ता आणि हस्तांतरणग्राही यांच्यातील वाद असलेली प्रकरणे.
- गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (IEPF) कडे हस्तांतरित केलेल्या सिक्युरिटीज.

टीपः या कालावधीत पुनः-प्रस्तुत केलेल्या सर्व शेअर्सची प्रक्रिया ट्रान्सफर-कम-डिमॅट मार्गाने केली जाईल. म्हणजेच, हस्तांतरणानंतर शेअर्स केवळ डिमॅट स्वरुपातच जारी केले जातील आणि त्यांच्यावर एक वर्षाचा लॉक-इन कालावधी लागू असेल. या संदर्भात अधिक माहिती/स्पष्टीकरणासाठी संबंधित भागधारकांनी कंपनी किंवा RTA शी खाली दिलेल्या कोणत्याही पत्त्यावर संपर्क साधावा.

| ग्रीव्हज कॉटन लिमिटेड | केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड |
|---|---|
| युनिट क्र. ३०१ आणि ३०२, तिसरा मजला, टॉवर बी, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, सेनापती बापट मार्गाजवळ, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३, भारत **दूरध्वनी:** +९१ २२ ४१७११७०० **ईमेल:** investorservices@greavescotton.com **वेबसाइट:** www.greavescotton.com | सेलेनियम बिल्डिंग, टॉवर बी, प्लॉट नं. ३१ आणि ३२, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, रंगारेड्डी, तेलंगणा, भारत - ५०० ०३२. **टोल फ्री क्रमांक:** १८०० ३०९४ ००१ **ईमेल:** einward.ris@kfintech.com **वेबसाइट:** www.kfintech.com |

ग्रीव्हज कॉटन लिमिटेडसाठी
अतींद्र बासू
ग्रुप जनरल कौन्सिल आणि कंपनी सेक्रेटरी
सदस्यता क्रमांक: एफ१३७९९

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०२ एप्रिल, २०२६



**shubham**

**शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कं. लि.**
कॉर्पोरेट कार्यालय : ४२५, उद्योग विहार फेज IV, गुरूग्राम -१२२०१५ (हरयाणा)
फो. : ०१२४-४२१२५३०/३१/३२, ई-मेल : customercare@shubham.co वेबसाईट : www.shubham.co

**ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)**

**ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी लिमिटेड (यापुढे शुभम असे म्हणण्यात येईल)चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत एक मागणी सूचना पाठवली ज्यात कर्जदारांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत थकबाकी रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.**

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदारांना व सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ (नियम) मधील नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

याद्वारे कर्जदार व सर्व लोकांना सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी लिमिटेडच्या खाली नमूद रक्कम अधिक तीवरील व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल. अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप-विभाग (८) कडे वेधण्यात येते.

| अ. क्र. | कर्ज क्र./ कर्जदाराचे नाव | मागणी सूचनेतील रक्कम | अनामत मत्ता | चिकटवण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | Loan No. 0AGN2407000005086460 ईश्वर भागीनाथ गायकवाड शुभम भागीनाथ गायकवाड | 15-01-2026 & ₹ 12,70,970/- | सर्व्हे क्र. २१८/१/२, प्लॉट क्र. १/ए, राधास्वामी कॉलनी, हर्सूल, ता. व जि औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००५. **क्षेत्रफळ :** ६६९.४० चौ.फू. **चतुःसीमाः** पूर्वेस -भाऊसाहेब काळे यांची जमीन, पश्चिमेस -सूर्यभान गायकवाड यांची जमीन, उत्तरेस -प्लॉट क्र. ०४, दक्षिणेस -४.५० मी. रुंद रस्ता. | 30-03-2026 |
| 2 | Loan No. 0AGN2108000005038421 सखाराम किशन खंडागळे, वर्षा सखाराम खंडागळे | 15-01-2026 & ₹ 7,08,659/- | घर क्र. १९, मिळकत क्र. ६१९२, मथुरा नगर, गट क्र. ९१, जोगेश्वरी गंगापूर, औरंगाबाद, महाराष्ट्र -४३११३३, **क्षेत्रफळ :** ३६६.२२ चौ.फू. **चतुःसीमाः** पूर्वेस -१८ फुटी रस्ता, पश्चिमेस -राजू दुबिले यांची मालमत्ता, उत्तरेस -मिळकत क्र. ६१९१, दक्षिणेस -मिळकत क्र. ६१९३. | 30-03-2026 |
| 3 | Loan No. AGN_1510_045810 सुधाकर पंढरीनाथ कांबळे, रंजना सुधाकर कांबळे, इंद्रजीत पंढरीनाथ कांबळे, वर्षा इंद्रजीत कांबळे | 15-01-2026 & ₹ 2,16,893/- | प्लॉट क्र. ५४९, गट क्र. ७८, मु. पोस्ट आसेगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र -४३११३६, **क्षेत्रफळ सुमारे** २७२१.३१ चौ.फू. **चतुःसीमाः** पूर्वेस -शासकीय रस्ता, पश्चिमेस -शासकीय रस्ता, उत्तरेस -शासकीय परिसर, दक्षिणेस -सहाण परिसर. | 30-03-2026 |
| 4 | Loan No. 0NND2102000005034447 शेख अतीख दस्तगीर शेख, शबाना दस्तगीर शेख, शेख दस्तगीर मगदूम शेख | 15-01-2026 & ₹ 2,91,261/- | ग्रामपंचायत घर क्र. ४८, मौजे खुपसरवाडी, ता. व जि. नांदेड, महाराष्ट्र -४३१६०६, **क्षेत्रफळ :** ९०९ चौ.फू. **चतुःसीमाः** पूर्वेस -रस्ता, पश्चिमेस -रस्ता, उत्तरेस -रस्ता, दक्षिणेस -इक्बाल शेख यांची मालमत्ता. | 30-03-2026 |
| 5 | Loan No. 0WSM2407000005087133 कृष्णा हरिभाऊ वाघमारे, प्रज्ञा कृष्णा वाघमारे | 15-01-2026 & ₹ 8,19,686/- | मालमत्ता क्र. २५१, मौजे गोळेगाव, ता. औंढा नाग, जि. हिंगोली, महाराष्ट्र -४३१७०५. **क्षेत्रफळ :** ९०० चौ.फू. | 30-03-2026 |

स्थानः गुडगाव
दिनांकः ०२.०४.२०२६
प्राधिकृत अधिकारी
शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी लिमिटेड



बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

**बँक ऑफ बडोदा**
**रीजनल स्ट्रेस्ड ॲसेट्स रिकव्हरी शाखा :** एमएमडब्ल्यूआर, ६ वा मजला, बडोदा हाऊस, दिवाण शॉपिंग सेंटरच्यामागे, एस. व्ही. रोड, जोगेश्वरी (प.) मुंबई – ४००१०२,
ई–मेलः sarmmw@bankofbaroda.co.in

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना परिशिष्ट – ४–ए [नियम ८ (६) आणि ९ (१) च्या तरतुदी पहा]**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ६ (२) आणि ८ (६) ची तरतुद सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, गहाण ठेवणारे आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की, सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारित असलेली, आणि जिचा ताबा बँक ऑफ बडोदा, सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, अशी खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसूल करण्यासाठी "जशी आहे तशी आहे", "जे काही आहे ते", आणि "तिथे जे काही असेल ते" या तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार/गहाण ठेवणारे/जामीनदार/ हमीदार/सुरक्षित मालमत्ता/मालमत्ता/थकबाकी/ देयके/आरक्षित किंमत/ई–लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील खाली नमूद केला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणाऱ्याचे नाव आणि पत्ता | ज्ञात बोजांसहित स्थावर मालमत्तेचे वर्णन, जर असल्यास | एकूण थकबाकी | ई–लिलावाची तारीख आणि वेळ | (१) आरक्षित किंमत (२) ईएमडी (३) बोली वाढ रक्कम (रुपये लाखांमध्ये) | ताब्याची स्थिती (रचनात्मक/ भौतिक) | मालमत्ता तपासणीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. लखबीर भट्टी सिंग (कर्जदार)** ए–४०३, ४था मजला, ग्लॅडिओली सीएचएस लिमिटेड, पंच मार्ग, यारी रोडच्यासमोर, वर्सोवा, अंधेरी पश्चिम, मुंबई – ४००१०१, **येथे देखील** : २बी–७०५, पंचतंत्र, यारी रोड, मत्स्य व्यवसाय शिक्षणसमोर, वर्सोवा, अंधेरी पश्चिम, मुंबई – ४००१०१, **येथे देखील** : सी क्रेस्ट बिल्डींग क्र. १, फ्लॅट क्र. १०४, नाना नानी पार्कसमोर, सात बंगला, वर्सोवा, अंधेरी पश्चिम – ४०००६१. | ते सर्व बंगला/ रो हाऊस कॉटेज क्र. १२० ज्याचे क्षेत्रफळ मोजमापे ६३.७६ चौ.मी. कार्पेट क्षेत्रफळ आहे, जे ६८६.३१ चौ. फूट कार्पेट क्षेत्रफळाच्या समतुल्य आहे त्यास लागून असलेल्या जमिनीच्या विशेष वापरासह, जिचे क्षेत्रफळ मोजमापे सुमारे १८०.०४ चौ.मी. अधिक तपशिलात नमूद केल्यानुसार, सर्व्हे क्र. ८४, हिस्सा क्र. ७ आणि सर्व्हे क्र. ९०अ, हिस्सा क्र. ८, गाव हरणे, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी. (गहाणदार : श्री. लखबीर भट्टी सिंग) | रु. ६८.०२ लाख दि. १३.०७.२०१७ रोजीनुसार + त्यानंतरचे न लागू केलेले व्याज आणि इतर शुल्क | दि. ०४.०५.२०२६ रोजी १४.०० वा. ते १८.०० वा. | १) रु २२.०० २) रु २.२० ३) रु ०.२५ | भौतिक | २८.०४.२०२६ |
| | | ते सर्व बंगला/रो हाऊस कॉटेज क्र. १२१ ज्याचे क्षेत्रफळ मोजमापे ६३.७६ चौ.मी. कार्पेट क्षेत्रफळ आहे जे ६८६.३१ चौ. फूट कार्पेट क्षेत्रफळाच्या समतुल्य आहे, त्यास लागून असलेल्या जमिनीच्या विशेष वापरासह, ज्याचे क्षेत्रफळ मोजमापे सुमारे १८०.०४ चौ.मी. आहे आणि अधिक तपशीलानुसार, सर्व्हे क्र. ८४, हिस्सा क्र. ७ आणि सर्व्हे क्र. ९०अ, हिस्सा क्र. ८, गाव हरणे, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी (गहाणदारः श्री. लखबीर भट्टी सिंग) | | दि. ०४.०५.२०२६ रोजी १४.०० वा. ते १८.०० वा. | १) रु २२.०० २) रु २.२० ३) रु ०.२५ | भौतिक | २८.०४.२०२६ |

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction या वेबसाइट लिंकला आणि Baanknet.com या ऑनलाइन लिलाव पोर्टलला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी ८१९७२३०९०७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

दिनांकः ०१.०४.२०२६
ठिकाणः मुंबई
सही/–
अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ बडोदा



OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

**ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**
**CIN : U67100TZ2014PTC020363**
**कॉर्पोरेट कार्यालय :** कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई–४०००२८.
**संपर्क क्र. :** ०२२-६९२३ ११११/ ९७७३४०६१७५, **ईमेल :** mumbai@omkaraarc.com/ **मोबा :** +९१ ९७६९१७०७७४

**[परिशिष्ट - IV ए] [रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८ (६)च्या तरतुदी पाहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलावासंबंधित जाहीर सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) व ९(१) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("सरफेसी ॲक्ट") अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

सूचना याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको/ सह-ऋणको सुरेश माणिक मोरे (ऋणको), अश्विनी सुरेश मोरे (सह-ऋणको) यांना देण्यात आली आहे की, याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण आहे/ ताब्यात आहे, जिचा प्रत्यक्ष ताबा **१४.१०.२०२५** रोजी "ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड" (ओएआरपीएल) सुरक्षित धनको यांच्याद्वारा घेण्यात आला आहे. याखाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री वर नमूद केलेले ऋणको व सह-ऋणकोकडील "मेसर्स ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड", सुरक्षित धनकोला देय असलेली प्रदानाच्या तारखेपर्यंत आत्ताच्या तारखेपर्यंतची वसूली वगळता आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रीत वसूल न झालेले संविदात्मक दरातील व्याज / निघालेले व्याज अधिक **२८.०२.२०१९ रोजीप्रमाणे रु. १०,४८,६९८.८५ (रुपये दहा लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे अठ्ठ्याण्णव व पैसे पंचाऐंशी फक्त)** या रकमेच्या वसूलीकरिता **२१.०४.२०२६ रोजी दु. ०१.०० वा.** (बोलींच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ **२०.०४.२०२६ रोजी सायं. ०६.०० वा.** पर्यंत आहे) "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", आणि "जे काही आहे तेथे आहे" व "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

"ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड"ने (ओमकारा पीएस २१/२०२४-२५ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली) **फुल्लर्टन इंडिया हाऊसिंग फायनान्स कंपनी लिमिटेड**कडून अंतर्निहित सुरक्षेसह दिनांकित **१९.०३.२०२५** अभिहस्तांकन करारनाम्याद्वारे पूर्वोक्त ऋणको / सह-ऋणकोच्या अनुसार असलेल्या संपूर्ण थकित ऋण अभिहस्तांकित केले आहेत.

स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत, इसारा रक्कम ठेव व ज्ञात भार (जर असल्यास) खालीलप्रमाणे आहेत :

| ऋणको/ हमीदार/ गहाणकारांची नावे | सुरक्षित मत्तेचा तपशील | मालमत्तेचे मालक | रक्कम व मागणी सूचना तारीख | राखीव किंमत | इरठे | बोली वृद्धी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| **सुरेश माणिक मोरे (ऋणको), अश्विनी सुरेश मोरे (सह-ऋणको)** | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे – रो हाऊस नं. सी–४, सी टाईप बिल्डिंग, गुरु दत्त नगर, संत एकनाथ हायस्कूलजवळ, पैठण रोड, चितेगाव, औरंगाबाद – ४३१००१. **सीमांचा तपशील : उत्तर** : गट नं. ६५, **पश्चिम** : संत एकनाथ हायस्कूल चितेगाव, **पूर्व** : देविदास कडू यांची जमीन, **दक्षिण** : रोड. **बिल्ट–अप एरिआ** : ७३.६७ चौ.मी. | सुरेश माणिक मोरे | रु. १०,४८,६९८.८५ (रुपये दहा लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे अठ्ठ्याण्णव व पैसे पंचाऐंशी फक्त) २८.०२.२०१९ रोजीप्रमाणे | रु. १२,९४,०००/– | रु. १,२९,४००/– | रु. १०,०००/– |
| **पाहाणीची तारीख व वेळ तारीख : १०.०४.२०२६ वेळ : दु. ०१:०० ते दु. ०२:००** | | | **ई–लिलावाची तारीख व वेळ : २१.०४.२०२६ रोजी दु. ०१:०० ते दु. ०२:००** | | | |
| **इरठेचा पुरावा/ केवायसी कागदपत्रे/ सहभागाचे बोली पत्र सादरीकरणाकरिता शेवटची तारीख : २०.०४.२०२६ रोजी सायं. ०६:०० वा. पर्यंत** | | | | | | |

**लिलावाच्या शर्ती व अटी :** विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **http://omkaraarc.com/auction.php** या सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लिलावाचे आयोजन "ओएआरपीएल" द्वारा ऑनलाईन करण्यात येणार आहे. इरठेसमवेत बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (ऑनलाईन तसेच प्रत्यक्ष प्रत) (एनईएफटी/ आरटीजीएस द्वारा भरणा किंवा मूळ स्वरूपात डीडी / पे ऑर्डर) **२०.०४.२०२६ रोजी सायं. ०६.०० वा.** पर्यंत आहे. **स्वारस्य असलेले बोलीदार ज्यांनी इरठे जमा केलेली आहे आणि त्यांना लॉग-इन आयडी व पासवर्ड निर्मिती, अपलोडींग डेटा, बोली सादरीकरण, ई-बोली प्रक्रियेवरील प्रशिक्षण, इ. आवश्यक सहाय्याकरिता संपर्क साधू शकतील – ई-लिलाव सेवा-पुरवठाकार "मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.", टेलि. हेल्पलाईन : +९१-७२९१९८११२४/ २५/ २६, हेल्पलाईन ई-मेल आयडी : support@bankeauctions.com आणि कोणत्याही मालमत्तेसंबंधित शंका असल्यास संपर्क साधावा – प्राधिकृत अधिकारी – श्री. तानाजी मांडावकर, मोबा. : + ९१ ९७६९१७०७७४, + ९१ ९०८२०८०७८९, मेल : tanaji@omkaraarc.com**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत विक्रीकरिता सांविधिक सूचना**

ही सूचना मत्तेच्या विमोचनाकरिता, विक्री बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळेत पुढील व्याज आणि सर्व किंमत, खर्च, आकार व खर्च यासह एकत्रीत यावर नमूद केल्यानुसार थकित देणींचे प्रदान करून, जर ते इच्छुक असल्यास, मत्तेच्या विमोचनाकरिता सल्ल्यासह वरील संदर्भित तारीख व वेळेत ई-लिलावाद्वारे विक्रीच्या/ लिलावाच्या आयोजनाबाबत त्यांना कळविणारी, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) आणि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या तरतुदीअंतर्गत वरील कर्ज खात्याच्या ऋणकोंकरिता कमीत कमी १५ दिवसीय (पंधरा) अनिवार्य सूचना सुद्धा आहे. जर प्रदानास कसूर झाल्यास, मालमत्ता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल, २००२च्या रुल ८(५) अंतर्गत विहित असल्यानुसार कोणत्याही प्रकारे विक्री करणे प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनकोंच्या स्वेच्छाधिकारावर असणार आहे.

दिनांक : ०३.०४.२०२६
स्थळ : औरंगाबाद
स्वाक्षरी/– प्राधिकृत अधिकारी, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि.
(ओमकारा पीएस २१/२०२४-२५ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली)


हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, ई-२५, एमआयडीसी, वाळुंज, छत्रपती संभाजीनगर येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. लोकसत्ता **मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **छत्रपती संभाजीनगर कार्यालय :** १०३, गोमटेश मार्केट, न्यू गुलमंडी रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००१. दूरध्वनी :०२४०-२३४६३०३, **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** * (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.